**धुळे महानगरपालिका पोट निवडणूक -२०२३**
**मतदार यादी तयार करण्याबाबतचे आदेश.**

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्र:-रानिआ/मनपा-२०२२/प्र.क्र. ५३/का.५,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :-१३ फेब्रुवारी, २०२३

**निवडणूक प्राथम्य**

प्रति,
आयुक्त,
धुळे महानगरपालिका.

विषय :- महानगरपालिका पोट निवडणूक फेब्रुवारी -२०२३
मतदार यादी तयार करण्याबाबतचे आदेश.
संदर्भ:- जा.क्र.धुमपा/न.स.वि/७१/२०२२-२३ दि.२७/०७/२०२२ चे पत्र.

महोदय,

धुळे महानगरपालिकेमधील प्रभाग क्र.१४-ब मधील नगरसेवक पद रिक्त झाल्याची सूचना राज्य निवडणूक आयोगास प्राप्त झालेली आहे.

२. उपरोक्त रिक्त पदाची पोटनिवडणूक एप्रिल,२०२३ मध्ये घेण्यात येणार असून,राज्य निवडणूक आयोगाने दिनांक १३/०२/२०२३ च्या अधिसूचनेन्वये दिनांक ५ जानेवारी, २०२३ ही cut-off date जाहीर केली आहे. त्या दिवशी (म्हणजेच ५ जानेवारी,२०२३ रोजी) अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी सदर पोट निवडणुकीसाठी वापरण्यात येईल.

३. या महानगरपालिकेच्या पोटनिवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याकरीता खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

# आदेश

१. मतदार यादीच्या कार्यक्रमाची व्याप्ती- दिनांक ०१/०१/२०२३ हा अर्हता दिनांक धरून भारत निवडणूक आयोगाकडून दिनांक ०५/१/२०२३ रोजी प्रसिद्ध झालेली विधानसभेची मतदार यादी महानगरपालिकेच्या पोटनिवडणुकीकरीता मतदार याद्या तयार करण्यासाठी वापरण्यात येईल. याकरीता भारत निवडणूक आयोगाने दिनांक ५ जानेवारी,२०२३ रोजी प्रसिद्ध केलेल्या मतदार यादीच्या आधारे निवडणूक प्रभागनिहाय मतदारांचे विभाजन करण्याची कार्यवाही तात्काळ सुरू करण्यात यावी.

२. उपरोक्त रिक्त पदांच्या पोटनिवडणुकीसाठी मतदार यादीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील:-

| | | | |
|---|---|---|---|
| (i) | प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे | : | दि. २७/०२/२०२३ |
| (ii) | प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | : | दि. २७/०२/२०२३ ते दि. ०६/३/२०२३ |
| (iii) | अंतिम प्रभागनिहाय मतदार याद्या प्रसिध्द करणे | : | दि. १५/०३/२०२३ |

३. प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी तयार करणे :-

३.१ महानगरपालिका आयुक्त यांनी विधानसभेच्या मतदार याद्यांचे विभाजन पारंपारिक पद्धतीने करणे आवश्यक आहे.याकरीता जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दि.५/०१/२०२३ ची विधानसभेची मतदार यादी प्राप्त करून घ्यावी व विधानसभा मतदार यादी भागांच्या आधारे प्रभाग क्र.१४ ब मध्ये समाविष्ट होणाऱ्या मतदारांची यादी तयार करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

३.२ प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादी तयार करताना पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

अ) राज्य निवडणूक आयोगाने क्र.रानिआ/ग्रापनि-२०२३/प्र.क्र.०३/का-८, दि ३०/०१/२०२३ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकरीता मतदार यादी तयार करण्याच्या अनुषंगाने एकत्रित आदेश निर्गमित केले आहेत. त्यानुसार मतदार यादी विभाजनाची कार्यवाही करावी.

ब) विधानसभा मतदार यादीत महानगरपालिकेच्या संबंधित प्रभागाच्या हद्दीत समाविष्ट असलेल्या एकूण मतदारांची संख्या आणि पोट निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादीतील मतदारांची एकूण संख्या समान आहे याची खातरजमा करण्यात यावी.

क) विधानसभेसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादीमध्ये बदल करण्याचे जसे की, नवीन नावांचा समावेश करणे, नाव वगळणे, नावातील दुरुस्ती व पत्त्यामधील दुरुस्ती करणे इत्यादीबाबतची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही. (आयोगाचे क्र.रानिआ-२०१५/प्र.क्र.३/प्रकल्प कक्ष, दिनांक १७/०४/२०१५ चे आदेश)

३.३. **प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे :-**

प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादीवर नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी, प्रारुप मतदार यादीला महानगरपालिका आयुक्त यांनी व्यापक प्रसिध्दी द्यावी. (परिच्छेद ५ प्रमाणे)

४. **प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करणे:-**

४.१ दिनांक २७/०२/२०२३ ते दिनांक ०६/३/२०२३ पर्यंत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर नियमाप्रमाणे विचार करुन प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करण्यात यावी. प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांवर फक्त खालीलप्रमाणे सुधारणा / दुरुस्ती करता येईल.

(i) लेखनिकांच्या काही चुका.

(ii) दुसऱ्या प्रभागातील चुकून अंतर्भूत झालेले मतदार.

(iii) संबंधित प्रभागातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे असूनही, महानगरपालिकेच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे.

४.२ विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांवर राज्य निवडणूक आयोगाच्या दि.३०/०१/२०२३ च्या सुधारीत आदेशानुसार निर्णय घेऊन आवश्यक असल्यास योग्य त्या सुधारणा करुन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या तयार करण्यात याव्यात.

५. परिच्छेद ३ प्रमाणे प्रारुप व परिच्छेद ४ प्रमाणे अंतिम प्रभागनिहाय मतदार यादीस महानगरपालिका आयुक्त यांनी खालीलप्रमाणे व्यापक प्रसिध्दी द्यावी जसे-

(अ) महानगरपालिका मुख्य कार्यालय, प्रभाग समितीचे कार्यालय व इतर कार्यालयातील सूचनाफलक.

(ब) स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्दीची सूचना देऊन.

(क) स्थानिक केबल टि.व्ही.वर प्रसिध्दीची सूचना देऊन.

(ड) महानगरपालिकांचे संकेतस्थळ, इत्यादी.

६. वरील सूचनांप्रमाणे आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीचे विभाजन विहित मुदतीत व बिनचूक करण्याची जबाबदारी संबंधित महानगरपालिका आयुक्त व नोडल अधिकारी (उपायुक्त, निवडणूक) यांची राहील.

७. कोविड-१९ च्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाने क्र. रानिआ/जिपपंस-२०२२/प्र.क्र.०१/का.७, दि. १७ जानेवारी, २०२२ अन्वये सविस्तर आदेश दिलेले आहेत. त्यानुसार शासनाने / महानगरपालिकेने कोविड-१९ च्या अनुषंगाने वेळोवेळी जाहीर केलेल्या विविध उपाययोजना व दक्षता घेण्याबाबत दिलेल्या सूचनांचे योग्य पालन करावे.

८. मतदार यादीचा कार्यक्रम आयोगाच्या https://mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मा: राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

( के.सुर्यकृष्णमूर्ती )
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :-

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. विभागीय आयुक्त,नाशिक
५. जिल्हाधिकारी, धुळे
६. सहायक आयुक्त (जनसंपर्क), राज्य निवडणूक आयोग
७. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
८. निवड नस्ती (कार्या.५), राज्य निवडणूक आयोग.

माहे एप्रिल-मे,२०२३ या कालावधीत होणाऱ्या महानगरपालिका,नगरपरिषदा/नगरपंचायती,जिल्हापरिषदा व पंचायत समित्या व ग्रामपंचायतीच्या रिक्त पदांच्या पोटनिवडणुकीसाठी दि.०५ जानेवारी,२०२३ रोजी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी ग्राह्य धरण्याबाबत

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/मनपा-२०२२/प्र.क्र.५३/का.५
नवीन प्रशासन भवन,मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई ४०००३२
दिनांक:- १३ फेब्रुवारी, २०२३

## आदेश

क्र.रानिआ/मनपा-२०२२/प्र.क्र.५३/का-५, मुंबई महानगरपालिका अधिनियम,१८८८(१८८८ चा मुंबई ३) च्या कलम १९ (१) (ब), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई अधिनियम क्र.५९) मधील कलम ७-अ, महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा.४०) च्या कलम ११, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा.५) च्या कलम १३ तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ (१९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३) चे कलम १२ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, दिनांक ०५ जानेवारी,२०२३ या दिवशी अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या मतदार याद्या, माहे एप्रिल २०२३ ते मे २०२३ या कालावधीत होणाऱ्या महानगरपालिका,नगरपरिषदा/ नगरपंचायती, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या तसेच ग्रामपंचायतीच्या पोटनिवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करण्यासाठी वापरण्यात येतील असे अधिसूचीत करण्यात येत आहे.

मा.राज्य निवडणुक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

13/2

(के.सुर्यकृष्णमूर्ती)
उपसचिव,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र